# मनामनांत कोंदण पिंपळपानी 'मैफल'स्मृतींचे

## पुणेकर रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात 'मटा मैफल'ची सांगता



स्वप्नील शिंदे

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

अक्षरे, अक्षरांतून शब्द, शब्दांतून उद्गार आणि उद्गारांतून उसळणारी नवरसांची अभिव्यक्ती! आणि त्याच्याच जोडीला ठोस भूमिका घेत परिसंवादांमध्ये केलेली अक्षरमांडणी...

...'मटा मैफल'ची सांगता झाली ती साहित्याचे 'सेलिब्रेशन' करणाऱ्या अशा वातावरणात. पिंपळपानी जाळीचे, मनांच्या कवडशांचे आणि नव्या पिढीच्या सर्जनशीलतेचे हे चित्र मराठी साहित्याच्या संपन्नतेची झलक दाखवणारे होते. साहित्याविषयीचे परिसंवाद, कविकट्टा, गझल कार्यशाळा आणि शेवटी कळस चढवणारे अभिवाचन... यामध्ये पुस्तकांचे स्टॉल, चहाचे घोट घेत तेथे रेंगाळणारी पावले, नव्या कोऱ्या पुस्तकावर आवडत्या लेखकाची सही घेण्याची, लेखकाशी बोलण्याची उत्सुकता आणि यातून सळसळणारा 'युवादिलां'चा उत्साह!


LIC
प्रस्तुत
मटा मैफल
Powered By
BookGanga.com
Creation | Publication | Distribution


मराठी साहित्याच्या आजच्या वळणाचा वेध घेणारा हा दुसरा दिवस रसिक, लेखक, कवी, प्रकाशक, विक्रेते आणि समीक्षकांसाठी वाचनसंस्कृतीचे समग्र दर्शन घडवणारा होता. आजच्या लिहित्या तरुणाचे स्वागत करून त्याच्या अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्याचे आश्वासन या मैफलीत आयोजित परिसंवादांमध्ये देण्यात आले; तसेच, मराठी साहित्याच्या संपन्न परंपरेला तंत्रज्ञानाचे कोंदण देण्याचा निर्धारदेखील व्यक्त करण्यात आला.

ज्ञानवृक्षाखाली रंगलेल्या कविकट्ट्याने दुसऱ्या दिवशीदेखील मने जिंकली. निमंत्रित कवींसोबत नवोदितांच्या शब्दांना रसिकांनी डोक्यावर घेतले. प्रेमापासून, निसर्गापर्यंत आणि पुढाऱ्यांपासून कोरड्या पडलेल्या विहिरीपर्यंत विविध विषयांना गवसणी घालणारा हा कट्टा न रंगता विसावला असता तरच नवल! गझल कार्यशाळेच्या माध्यमातून उपस्थित प्रेक्षकांना साहित्यिक होण्याची ऊर्मी दिली.

बदलती भाषा, जीवनशैली आणि समाजमनाचे प्रतिबिंब साहित्यात पडायला हवे, ते अशा उपक्रमांमधून पडेल, असा आशावाद वाचकांनीदेखील व्यक्त केला. अखेर निरोप घेतला गेला तो, कार्निव्हल, 'स्वरझंकार'पासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत केलेल्या 'पुणे सुपरफास्ट' विचारमंथनापर्यंत...'मटा'च्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित अशा उपक्रमांना दाद देत!

➤➤ सविस्तर वार्तांकन ...२, ३